साक्षीदार क्र **०१** ची सरतपासणी
देवाची शपथ खरे सांगतो
नाव :–कवडु लक्ष्मण उईके
वय ४५ वर्ष, व्यवसाय–मजुरी
राह.बेला, ता.उमरेड, जि.नागपूर.

**<u>सरतपासणी सरकारी वकील श्री.जे.एम.बोरकर यांच्या मार्फत</u>**

**१.** घटना दि.१७/०६/२०२२ रोजीची रात्री ८.१५ वाजताची आहे. घटनेच्या दिवशी मी सेक्यूरिटी म्हणून होतो त्यावेही रस्त्याचे काम सुरू होते. घटनेच्या दिवशी रात्री ८.१५ वाजता मी ड्युटीवर आलो असता माझा भाचा नामे आयुष सुर्यभानजी मडावी हा बेलाकडुन गावाकडे चालला होता. त्यावेळी सालईवरून एक बाईक आली व त्यावेळी माझा भाचा आयुष याला सदर गाडीने धडक दिली. ज्या गाडीने धडक दिली त्या गाडीचा नंबर मला आठवत नाही कारण त्यावेळी रात्र होती. त्यानंतर सदर गाडी धडक देउन निघून गेली. त्यावेळी माझा भाचा आयुष हा बेहोश पडुन होता व त्याला डोक्याला, तोंडाला लागले होते व त्याचे दात पडले होते. त्यानंतर मी आयुष याला घेउन दवाखाण्यात गेलो. ज्या गाडीने माझ्या भाच्याला धडक दिली ती गाडी जोरात होती. त्यानंतर पोलिस आले व त्यांनी माझी रिपोर्ट लिहीली. आता मला फिर्याद दाखविण्यात आली त्यातील मजकूर खरा व बरोबर असुन त्यावर माझी सही आहे त्यास **निशाणी क्र.१४** देण्यात आला. आता मला प्रथम खबर अहवाल दाखविण्यात आला त्यातील मजकूर खरा व बरोबर असुन त्यावर माझी सही आहे त्यास **निशाणी क्र.१५** देण्यात आला. पोलिसांनी माझे बयाण घेतले होते. ज्या आरोपीने माझ्या भाच्याला धडक दिली होती त्यांना पाहिल्यास मी ओळखतो. तो आजरोजी न्यायालयात हजर आहे.

**<u>सरतपास संपला.</u>**

**<u>आरोपीतर्फे ॲड. पी.एच.रघुते यांच्यामार्फत उलटतपास सुरू.</u>**

**२.** हे म्हणणे खरे आहे की, मी माझ्या भाच्यासोबत गाडीवर आलो नव्हतो. त्यावेळी माझ्या भाच्याजवळ टु–व्हीलर गाडी होती. हे म्हणणे खरे नाही की, ज्या ठिकाणी अपघात झाला त्या ठिकाणी मी प्रत्यक्ष हजर नव्हतो. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी सिमेंट रोडचे काम चालु होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी एका बाजुने खोदकाम केले होते व

एका बाजुने सिमेंट रोड झाला होता. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी सिमेंट रोडवर पॅचेस पडलेले होते व ब्रेकर लावण्यासाठी एक–एक फुटाच्या खाली जागा सोडलेल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, सिमेंट रोडचे काम चालु असल्यामुळे सिमेंटच्या थैल्या व लोहा रोडवर आजुबाजुला ठेवलेले होते.

३. मी रात्री ८.०० वाजता ड्युटीवर जॉइंड झालो होतो. हे म्हणणे खरे आहे की, मी ड्युटीवर जॉइंड झाल्यानंतर मी माझ्या कामात लागलेलो होतो. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, कामात म्हणजे त्यावेळी मी रोडवर बसलेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, रात्रीची वेळ असल्यामुळे रोडवर कोणती गाडी कुठून येत आहे याबाबत मला काही माहित नाही. असे काही झाले नाही की, माझ्या भाच्याने त्याचे गाडी तेथे थांबवुन ठेवली होती. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, त्याची गाडी चालु होती. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी माझा भाचा बेल्यावरून मुरादपुर येथे जात होता. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी माझा भाचा हा मुरादपुरला जात असतांना तो रस्त्यावरील टाकलेल्या बांधकामाच्या वस्तुंना धडकला व खाली पडला. ज्या ठिकाणी अपघात झाला त्या ठिकाणी एका बाजुला सिमेंटच्या रस्त्याचे काम झालेले होते व दुस–या बाजुने रस्त्यासाठी खोदकाम केलेले होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीच्या गाडीने माझ्या भाच्याच्या गाडीला धडक दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, आयुष हा माझा भाचा असल्यामुळे त्याच्या सांगण्यावरून मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी फिर्याद दिली आहे. मी पोलिसांना फिर्याद व बयाण देतेवेळेस आयुष याचे दात पडले याबाबत सांगितले नव्हते कारण मी लगेच आयुषला घेउन नागपुर येथे दवाखाण्यात गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, आयुष याचे दात पडलेच नव्हते त्यामुळे मी फिर्याद व बयाण देतांना सांगितले नाही. असे काही झाले नाही की, मी घटनास्थळावर जाण्याच्या पुर्वीच आयुष घटनास्थळावर पडलेला होता. हे म्हणणे खरे आहे की, मी आयुष याला उचलले नाही दुस–यानेच उचलले होते.

**उलटतपास पुर्ण.**

**<u>फेरतपास काही नाही.</u>**

वा.दा.ब.अ.सा. समक्ष

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि.१९.०६.२०२५

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड